आधुनिक शाहिरांचे कविकुलगुरु,
राष्ट्रशाहीर म. ना. नानिवडेकर ह्यांचे
स्फूर्तिस्थान, प्रख्यात शीघ्रकवि उस्ताद
लहरी हैदर, कोल्हापूर, ह्यांच्या स्मृतीला
सादर समर्पण !

**नानिवडेकर शाहिरी संगम**

१/१८, गोरेगावकर चाळ, गिरगाव, मुंबई ४०० ००४.

# सुधारणेची दिशाभूल-पोवाडा

**शाहीर म. ना. नानिवडेकर**

## चौक १ ला

(चाल – मिळवणी) परिस्थिती खरोखर कठीण । देश हिंदुस्तान । सुधारिल कोण । सुशिक्षित वर्ग जबाबदार ।। केला नाही यांनी जर सुविचार । शंका नको देश खचित बुडणार ।। १ ।। वैभवाच्या पूर्ण शिखरावर । देश आजवर । होता खरोखर । शास्त्र-विद्येत पहिला मान ।। द्रव्याची तुडुंबली खाण । प्रसिद्ध सुवर्णभूमि नावानं ।। २ ।। हिंदुस्थान तोच हा देश । आज काळास । चालला अधोगतीस । आमचे आम्हीच कारण त्याला ।। गुलामगिरी बसली माथ्याला । आता तरी नको का विचार व्हायला ।। ३ ।।

(चाल – लावणीची) हिंदु लोक गोगलगाय खरे पुतळे शांतीचे ।। धृ० ।। परकीयांनी छळले तरि ना प्रतिकार केला । उलट परकीयांशी यांनी दोस्तपणा केला । अशामुळे फसले हिंदु गरीब भोळे साचे ।। १ ।। दोस्त किंवा वैरी नुमजे खरोखर यांना । सर्व धर्मीयांशी स्नेह केला सत्य जाणा । गुलामगिरी नशिबी आली गेले राज्य आमुचे ।। २ ।। सुशिक्षित चिंताग्रस्त नोकरिच्या पायी । अशिक्षित जन त्या देशहिताचे ज्ञान नाही । राष्ट्रकार्य बंधू जनहो कुणी करायचे ।। ३ ।।

(चाल – मिळवणी) इंग्रजांनी सोय पहा केली । शिक्षणाची भली । हिंदु मंडळी । धन्य खरोखर बुद्धिमान ।। शाळा कॉलेजात शिक्षण घेऊन । मिळविती विद्वानांत मान ।। १ ।। कित्येकांनी जाऊन परदेशास । इंग्लंड जर्मनीस । आणखी अमेरिकेस । उच्च शास्त्राचे शिक्षण घेऊन। पहिल्या वर्गात पास होऊन । झेंडा फडकविला विदेशी जाऊन ।। २ ।।

( चाल – दांगटाची) शिक्षणानं फायदा भारी झाला । अनेक भाषा लागल्या समजायला । इतिहास मिळाले वाचण्याला । त्याच्यामुळं पुरा शोध लागला । राष्ट्र सारी चढली उन्नतीला । पहा त्याच्या उलट देश आपुला । होता फार पूर्वी सुधारलेला । त्यावेळी जगात मान पहिला । हल्ली पहा तोच कंगाल झाला । अवनती किती सांगू तुम्हाला । गुलामगिरी बसली माथ्याला । आताच जर नाही यत्न केला । जाईल पुरा देश रसातळाला । असा सूज्ञांनी विचार केला । यत्न केला राष्ट्रउन्नतीला । तनमनधन वाहिले मायभूला । भक्त देशाचे म्हणावे यानला धन्य ते ।। दादा ।। जी जी जी ।।

(चाल – कहाणीची) वंदन देशभक्तांला हो मायभूच्या शूर वीरांला ।। धृ० ।। लालाजी लजपतराय, लोकमान्य टिळकांला। धर्मवीर श्रद्धानंद, दादाभाई नौरोजीला । ज्यांनी वाहिले प्राण देशाला हो ।। १ ।। देशपांडे, वल्लभभाई पटेल नेहरू या वीरांला । धर्मवीर डॉक्टर मुंजे, महात्मा गांधींला । स्वराज्याच्या निघाले मोहिमेला ।। २ ।। थोरथोर देशभक्त करिती देशकार्य । देव तेच जगती आम्हां खरे वंदनीय । महादेव नमित सकलांला ।। ३ ।।

( चाल – लावणीची ) शूर वीर हिंदभूच्या येति उदराला ।। धृ० ।। कारागृह देशापायी भोगताती । सावरकर बांधवांची साऱ्यांना माहिती । अंदमानामध्ये किति हो छळ सहन केला ।।१।। उपवास करून कितिक देह झिजविताती । हुतात्मे कितिक चढती हसत फासावरती । हिंद माताकी जय वंदे मातरं बोला ।। २ ।।

(चाल – मिळवणी) देशापायी क्लेश भोगणे । कारागृही जाणे । हाल सोसणे । स्वर्गसुख वाटे देशभक्तांस ।। मिळावे स्वातंत्र्य हिंददेशास । हाच अहोरात यांचा निदिध्यास ।। १ ।। असे पुण्य पुढारी लाभून । हिंदी जनतेनं । सावध होऊन । लावावा हातभार देशकार्यास । स्वस्थ बसू नये आज समयास । आपापल्यापरी यत्न करण्यास ।। २ ।। देशकार्य नव्हे एकटयाचे । आहे सकलांचे । हिंदपुत्रांचे । साऱ्यांचा हवा त्यास हातभार ।। केला नाही यांनी जर सुविचार । शंका नको देश खचित बुडणार ।। ३ ।।

## चौक २ रा

( चाल– मिळवणी ) विलायती शिक्षण घेऊन । शाहणे झाले जन । विद्या परिपूर्ण । प्राप्त केल्या तरिहि पोट भरण्यास । नोकरी सरकारी मार्ग दिसे त्यांस । अक्कल नाही देशी धंदा करण्यास ।। १ ।। देशी धंदे लयाला गेले । बेकार लोक झाले । शिकले सवरलेले । नोकरीच्या मागे लागले फार । रिकामी जागा एकन् हजारो उमेदवार । नोकऱ्या तरी साऱ्यांना कोठून मिळणार ।।२।। होता मान पूर्वी नोकरीला । हुषार कारकुनाला । पाहुन योग्यतेला । बढति पगारात

खचित मिळणार ।। हल्ली सारा वशिल्याचा बाजार । योग्यता कोण कुणाची पहाणार ।। ३ ।। वशिल्यांचे ऐका प्रकार । ब्राह्मण जातीवर । पूर्ण बहिष्कार । नोकरी दुर्मिळ हिंदु लोकांस । पहिला मान साहेब ख्रिस्त लोकांस । मागोमाग पार्शी मुसलमानांस ।।४।। वरिष्ठ तो सह्या करण्याचा । मालक साचा । पगार पहा त्याचा । तीनशेवर रुपये त्याला मिळणार । कारकून हाताखाली एम. ए. असणार । साठ रुपयांत राबत बसणार ।। ५ ।।

( चाल – जी जी जी ) शाहणपण कारकुनाचे राहते जागच्या जाग्याला । अवचित वरनं जसा हुकूम होईल वेळेला । मुकाटचानं करावे लागे काम कारकुनाला । अधिकार नाही बरोबर न् चूक म्हणण्याला । जर दाविल स्वतःचे शहाणपण वरिष्ठ साहेबाला । डोईजड असा कारकून घातक आपल्याला । मगरूर म्हणून हाकलून काढती त्याला ।।

( चाल – मिळवणी ) शाश्वती नाही नोकरीची । योग्य बढतीची । आणखी पेन्शनीची । हजारामध्ये एखादा पुढे येणार ।। बाकी सारे जन्मभर खपणार । साठ एके साठ करीत बसणार ।। १ ।। अशी स्थिति असून खरोखर । सुशिक्षितांवर । उपाय ह्याच्यावर । शोधतो कोण काळजी कुणाला । नोकरीचा चान्स ज्यांना मिळाला । अशांना दीड बोटं स्वर्ग उरला ।। २ ।।

( चाल – जी जी जी ) तुच्छतेनं वागती पाहून इतर लोकांला । सुग्रास अन्न मिळू लागलं तया खाण्याला । कोण करतो काळजी देशाची म्हणती मनाला । बेफिकीर चैनी करण्याचा नाद लागला । फुरसतीची कामे पहा यांची

सांगतो तुम्हाला । सांजसकाळ जाती खेळण्यास टेनिस-क्लबाला । चक्काचूर करती पैशांचा अयोग्य कार्याला । टेनिसाचा झारा परदेशी खरेदी करण्याला । बिलियर्ड परदेशी टेबल विकत घेण्याला । पिंगपाँग बॅडमिंटन बायकि खेळांला । ( चाल – कटावाची ) ऐन रंग चढला खेळाला । आठवण झाली समयाला । बोलवा म्हणति हॉटेलवाल्याला । लाव डबल चहा साऱ्याला । हंटली पॉमर बिस्किटाला । दिवळा हत्ती सिगारेटाला । भजी चिवडा शेव आणण्याला । सांगती हॉटेलवाल्याला ॥

( चाल – जी जी जी ) दवडिती कारणाविण पैसा असा हॉटेलाला । तीन चाकी सायकल परदेशी पोरांस बसण्याला । दिवसात तीन चार सूट हवेत घालण्याला । बायका पोरा-सुद्धा परदेशी मालानं नटलेला । परदेशी मालानं संसार पुरा भरलेला ।

( चाल – मिळवणी ) पोटासाठी विकुन सारे ज्ञान । शरीर आणि मन । तसाच स्वाभिमान । साहेबाचा बूट पुसत बसणार ॥ पांढरपेशा म्हणून फुगणार । देशहित ध्यानी मनी नसणार ॥ १ ॥ हेच करती घात राष्ट्राचा । हिंदी बांधवांचा । देशभक्तांचा । कसे ते पुढील चौकी कळणार । स्वानुभव म्हणून स्पष्ट कथणार । सूज्ञ जन रोष मुळी न धरणार ॥ २ ॥

## चौक ३ रा

( चाल – दांगटाची ) शहाणं व्हावं वाटतं प्रत्येकाला । म्हणुन जाती शाळा न् कॉलेजाला । कितिक होती पास

परीक्षेला। मिळविती पदव्यान् डिग्रीला । आय. सी. एस्. एम्. ए. एल्एल्. बी. ला। बहुतेकांचे ध्येय सांगतो तुम्हाला। पहिली आशा सरकारी नोकरिला। अर्ज घेऊन घालती हेलपाटयाला। खुष व्हावा साहेब पहिल्या भेटीला। म्हणून सूट नवा विकत घेतला। नोकरीसाठी गात्रठी साहेब बनला। नोकरिचा चान्स एखाद्याला। हजारामध्ये एखाद्याला। इतरांस नन्नाच ठरलेला। व्हेकन्सी नाही आजमितीला। मुकाटयानं परत घरला फिरला। पण कापडयाचा खर्च फुकट गेला। यत्न मग खासगी नोकरिला। त्यातल्या त्यांत शाळा न् हायस्कुलाला। ॲक्टिंग तरी चान्स द्यावा मजला। निदान् विनपगार ऑनररीला। काम पाहून जागा द्यावी मजला। म्हणुन विनविती हेडमास्तरला। बी. ए. वाले दादा ।। ज़ी जी ।।

( चाल – जी जी जी ) ग्रॅज्युएट कितिक विनविती व्यापारीवर्गास। परदेशी व्यापाऱ्यास दाऊन पूर्ण विश्वास। दुकानावर राहती त्याचा जमाखर्च लिहिण्यास। किती एक बनुन एजंट फिरती मुलखास। हतभागी बहुत अशी सुद्धा नोकरि मिळण्यास। निरुपाय म्हणुन विनविती वखार-वाल्यास। बारा तास राबुन मिळविती दरमहा पंचवीस। नोकरदार म्हणुन मानिती धन्य स्वतःस। आईबाप हर्षती नोकरि मिळालि मुलग्यास। सासू सासरा हर्षती नोकरि मिळालि जावयास। अशापरी नोकरदारांचा खरा इतिहास।

( चाल – मिळवणी ) नोकरि मिळणे काम नशिबाचे। तसेच वशिल्याचे। नव्हे योग्यतेचे। नोकरि मिळताच ऐट चढणार ।। १ ।। गोरगरिबांस पीडा करणार। वरिष्ठ साहे-

बाचा बूट पुसणार ।। १ ।। जरि पगार पुरा पोटाला । लांच खाण्याला । सदा लाचावलेला । कामासाठी गोरगरिब येती । त्यांच्याशी भाषा मुळि न करती । लांच मिळताच स्वारी खुलती ।। २ ।।

( चाल – जी जी जी ) गरिबांचे काम जरूरीचे असते समयाला । भेटण्यास जाती सकाळीच ह्यांच्या बिऱ्हाडाला । शिकवलेला मंत्र रावसाबानं बायकापोराला ।

(चाल – कटावाची) रावसाहेब घरात नाहीत । किंवा आहेत भारी कामांत । ( चाल – जी जी जी ) असा खोटा जबाब सदोदित त्यांचा ठरलेला । महत्वाची काम घरामधली सांगतो तुम्हाला । दिनक्रम पहा ह्यांचा खात्री होईल तुम्हाला । एक क्षणसुद्धा नाहि लावित देशकार्याला ।

( चाल – दांगटाची ) उजाडुन आठाचा ठोका पडला । आरंभ मग डोळे चोळण्याला । अंथरुणावर उठून बसला । जांभया देत देत हुकूम सुटला । अरे आण कढत चहाचा पेला । पिऊन मग गेला परसाकडला । चहाविण होईना परसाकडला । त्याच्यापुढं तोंड धुवाया लागला । उन्ह पाणी लागलं अंघोळीला । सकाळचा वेळ त्यातच गेला । अकरा वाजण्याचा सुमार आला । गडबडीने जेवण करून उठला । कपडे करून गेला कचेरीला । तिथून सहा वाजता परत आला । दोन कप चहा ढोसकला । सिगार फुंकीत बाहेर पडला । सायंकाळी गेला हवा खायाला । किंवा गेला पत्ते खेळण्याला । अगर गेला टेनिस कोर्टाला । तेथून आठ वाजता परत आला । जेवण उरकले साडेआठाला । ताबडतोब पडला अंथरुणावर नवाला ।। दादा । जी जी जी ।।

( चाल – मिळवणी ) अशिक्षित बरे त्यांच्याहून। नसुन बहु ज्ञान। देती सन्मान। सूज्ञ लोकांस पुढारी गणणार। केला नाही यांनी जर सुविचार। शंका नको देश खचित बुडणार ।। १ ।।

## चौक ४ था

( चाल – मिळवणी ) अंगातील धमक कमी झाली। शक्ती सारी गेली। किडकिडीत झाली। पिढी तरुणांची पहा निरखून ।। कारणं ह्याची कितिक पहावी शोधून। थोडिशी सांगतो घ्यावी ऐकून ।। १ ।। शिक्षणाचे सारे परिणाम। अंगात नाही जोम। जिवंत जेमतेम। नविन संसार थाटला ल्हान। तीस वर्षांचे सुमारे वयमान। तोच अवचीत जातसे प्राण ।।२ ।। संसाराची झाली धुळधाणी। अनाथ होई पत्नी। रडति निशिदिनी। दुजे कोण ह्याला काय करणार ।। सोडिले जुने विचार आचार। मग असे प्रकार का न घडणार ।। ३ ।। जो जावई वागे साहेबांत। सिगार तोंडात। चहा सदोदित। स्वत:स आणि येणाऱ्या जाणाऱ्यांस ।। शहरामध्ये आहे नोकरी ज्यास। असा जामात मान्य श्वशुरास ।। ४ ।। सारे गुण त्याचे पाहाती। सुस्वरूप कांती। शिक्षण आणि शेती। कन्या अर्पिती हर्ष मनिं फार। रोगि वा निरोगी नाही बघणार। अशाने मुली दु:खामध्ये पडणार ।। ५ ।। तरुणांना शरम नाही मनी। खेळ मर्दानी। स्वदेशी सोडूनी। बायकीपणा तेवढा आवडूं लागला ।। मर्द व्यायामाचा वीट आला। कुस्ती दांडपट्ट्याचा काळ सरला ।। ६ ।।

( चाल – जी जी जी ) देशात आमच्या मर्दानी खेळ आहेत। दांडपट्टा कुस्ती हे प्रमुख त्यामधे होत। आटया-पाटया हुतुतु खोखो खेळ प्रख्यात। व्यायाम नमस्काराचा जुना विख्यात। मनसोक्त होतसे शरीरास मेहनत। उद्योगास राहतसे तरतरीत तब्येत। हे खेळ खेळुन पूर्वजांची कीर्ति जगतात। इतिहास साक्ष देई शौर्य त्यांचे लढाईत। मारुनि लढाया मग मरती म्हातारपणात। हल्लीची तरणी पिढी आणा लख्ख उजेडात। निस्तेज कातडी दिसे रक्त नाहि अंगात। जागजागची हाडके डोकावून पाहति वरतं। जाती मरून कितिएक तीस वर्षांच्या आत। आणि बेफिकिर वागति काळजिसुद्धा नाही घेत। चैनिचा नाद हे शिकती शाळा कॉलेजांत। काढुन कर्ज आई-बाप पैका पुरवीत। व्हावा शाहणा मुलगा हा योग्य हेतु मनात।

( चाल – दांगटाची ) मुलगा मग पुरा स्वतंत्र बनला। हजामतिचा सेट विकत घेतला। हातानं दाढी कराया शिकला। ओठावर मिशी खपेना त्याजला। वस्तारा मिश्या-वरनं फिरला। बायकीपणा पुरा अंगात मुरला। टेनिस क्रिकेटचा नाद लागला। मोठेपणा ह्यातच वाटू लागला। विचार जरा करा असा आपल्याला। देशी खेळ किति आहेत तुम्हाला। उणेपणा काय त्यात पाहिला। खर्चता शेकडो रुपायाला। टेनिसाचं कोर्ट करायला। क्रिकेटाचं पिच करण्याला। गुळगुळीत जमीन करण्याला। तोच जर आखाडा एक बांधला। मल्ल कुस्तिवान त्या जाग्याला। खेळतील किति एका दिवसाला। मल्लविद्या खरी हिंदुस्तानाला। जगामध्ये पहिला नंबर लावला। समजेना कसे हे तुम्हाला।

परदेशी खेळांच्या का मागं लागला । बडेजावि सांगता त्याचि कुणाला । ते बॉक्सिग आणि जुजुत्सु हवं कशाला । झिस्को का गामाच्या खाली पडला । मर्म ह्याचं पुरं घ्या मनाला । पीटरसन दुसरा साहेब आला । कुस्तिवान तिकडं नावाजलेला । आला गामासंगं जोड द्यायला । नाहि दीड मिनिटभर टिकला । आमचि हवा गरम पडलि त्याला । कुस्तिची ।। दादा ।। जी जी जी ।।

(चाल – मिळवणी) देशामध्ये जिवंत राहण्याला । तरुण पीढीला । कार्य करण्याला । व्यायामाचा मंत्र लागू पडणार ।। सूज्ञ जन शांत श्रवण करणार । महादेव शाहिर कवन गाणार ।। १ ।।

■ ■

# आदर्श ग्रामराज्याचा पोवाडा

कवि : **म. ना. नानिवडेकर**

## चौक १ ला

लोकशाहिचा फिरता शाहिर आला दारावर ।
ग्रामराज्याचा ऐका पोवाडा सरा सरा म्होरं ।। धृ० ।।
स्वातंत्र्यामधि दरेक खेडंगाव व्हावं नमुनेदार ।
चावडीमधला कारभार जसा काय
दिल्लिचा दरबार ।। १ ।।
आदर्श गावच्या खुणा सांगतो टिपुन ठेवा सारं ।
सत्य सांगतो स्वानुभवाचं एकेक अक्षर ।। २ ।।
खरं सागाया बंदि नसावी कुठंहि जगावर ।
चुकी भूलीला माफी असावी करतो नमस्कार ।। ३ ।।
गावचे राजे तुम्हि आसनि बैसला पंच परमेश्वर ।
न्याय नीतीनं राज्य हाकारा करतो नमस्कार ।। ४ ।।

## चौक २ रा

तुम्हीच राजे तुम्हीच मायबाप तुम्हीच सरकार ।
तुम्हीच तारणार तुम्हीच मारणार जन्मही देणार ।।५।।
जन्माचि नोंद तुम्हि करता ।
मृत्यूचं टिप्पण ठेवीता ।
लोकसंख्या तुम्हिच मोजिता ।

सांगा तुमच्या गावामंदि कोण कोण बेकार ।
अर्ध उपाशी दिवस कंठिती करून रोजगार ।।
नाहिं पेटली कुणाची चूल ।
कोण उपाशी काढिती हाल ।
हुडकून कसे काढाल ।
सरपंच तुम्हि फेरी मारा संमद्या गावभर ।
ज्याचे घरावर धूर दिसेना ओळखा ते घर ।।
गरिबांची संख्या मोजा ।
आणि त्यांच्या पुरवा गरजा ।
सोसायटी स्थापा काजा ।
गावातला पैसा गावात जमवा गावकऱ्यांसाठी ।
अपुल्या गावची स्थापा झडकरी सहकारी सोसायटी ।।
जमा होईल पैका सहज ।
धनिकांना मिळेल व्याज ।
गरिबांचं होईल काज ।
गरजूंना मिळेल कर्ज ।
आठवड्याचा परक्या गांवाचा पुरे आता बाजार ।
सोसायटीचं दुकान चालवा खासा व्यवहार ।।

## चौक ३ रा

एक एक खेडंगाव सुधरून गेलं दणक्यानं म्होरं ।
चावडीवरती आदर्श त्यांची ढाल फडकणार ।।
सर्वांगांनी विकास नेला त्यांनी आघाडीला ।
त्या खेड्यांचा जिल्ह्यावरती झाला ब्रोलबाला ।।
विद्यामंदिर शाळा बांधिली तुमच्याबी गावाला ।

नविन इमारत शोभा वाढली खरं कि नाहि बोला ॥
शाळा बांधली सामान मिळालं आले मास्तर ।
एवढ्यानंच काय तुमची शाळा आदर्श बनणार ॥
पहिली घंटा ठंठं झडली प्रार्थनेच्यासाठी ।
पोरं साऱ्या गावभर कुणि कुणि ढोरांच्या पाठी ॥

गुरुजीला दोष का देता ।
छडी नाही त्याचे हाता ।
कशि शिस्त लागावी म्हणता ।
जर गुरुजी करडा दिसता ।
बदलीची धमकी त्या देता ।

कडक शिस्त आणि धाक दरारा नाही पोरांना ।
गुरुजी देखत पोरंपोरी घालिती धिंगाणा ॥

पटावरी तीनशे पोरं ।
प्रार्थनेस निम्मिच हजर ।
तरि चाले ठीक व्यवहार ।
ना तिकडे कुणाची नजर ।

म्हणाल गुरुजी काम शाळेचं करतील बरोबर ।
आईबाप कामात, गुरुजी वर्गात, पोरं गावभर ॥
गावकऱ्यांच्या सहाय्यावाचुन गुरुजी तो दुबळा ।
अधिकाऱ्यांना कागदी आढावा दावितसे सगळा ॥

वरिष्ठांची मर्जि राखावी ।
कशि तरि नोकरि टिकवावी ।
पगाराला गाठ घालावी ।

पवित्र शिक्षण क्षेत्रि अशि का गुरुजीची दैना ।
कसा फुटावा गुरुजींना मग शिकवाया पान्हा ॥

शाळेचं पवित्र कार्य ।
गुरुजींना करा हो सहाय्य ।
करा त्यांची दरेक सोय ।
पालकजन तुम्हि मुलं पोचवा स्वतः नेऊन ।
वर्गं गुरूंच्या करा हवाली नीट वजावून ।।
चुकारपण मग मुले न करतील रमतील शाळेत ।
मन लावुनी गुरुजी पण मग अभ्यासहि घेत ।।
मुलं रमतील गुरुजी भौती ।
अभ्यास जागुनी करती ।
भराभर चालली प्रगती ।
४ थी ७ वीच्या झाल्या परीक्षा निकालही आला ।
१०० टक्के रिझल्ट लागला झाला बोलबाला ।।
येवढ कशामुळं सुयश लाभलं सांगा कारण ।
चालक पालक मंडळी देती शाळेकडं ध्यानं ।।
चालक पालक मुलं मुली आणि गुरुजी जरि एक ।
त्या शाळेचा आदर्श म्हणुनी जगभर लौकीक ।।
त्या शाळेचा गाईल पोवाडा नानिवडेकर ।
ग्रामराज्याचा ऐका पोवाडा सरा सरा म्होरं ।। धृ० ।।

## चौक ४ था

आदर्श गावचा कसा चालतो ऐका कारभार ।
पंच मारिती फेरी सकाळी संमद्या गावभर ।।
लहान मोठे मुजरे करिती करिती नमस्कार ।
अडी अडचणी समजून देती सारे गावकर ।।
रस्त्यावर अन् गल्ली बोळात नाही कुठे केर ।

खतामुतांचे ओघळ नाही कुठेही दिसणार ।।
केरन् कचरा गोळा करुनी गाडिती खडड्यात ।
कंपोस्टाचे खत दुहेरी फायदा काढतात ।।
घरोघर भिंती आणि आंगण सारविती चोख ।
गालीचापरि दारापुढती रांगोळी लख्ख ।।
कोने कोपरे मोडून गावचे रस्ते करा रुंद ।
पिढ्या पिढ्याच्या जुन्या वहिवाटी करा आता बंद ।।
नव्या युगाचा माणुसकीचा वारा सुटे मंद ।
एकजुटीने प्रेमे नांदा भोगा आनंद ।।
थोडं हिकडं काय, थोडं तिकडं काय, जाऊ द्या रत्स्यात ।
आपुल्याच गावच्या फायद्यासाठी सोडा आता स्वार्थ ।।
तुमचं खेडेगाव टुमदार बनवा तुमच्याच हातानं ।
रस्त्याकडंची गटारं बांधा घडीव दगडानं ।।

अशि गावची साफसफाई ।
कुठं केर न् कचरा न्हाई ।
सांडपाणी झिरपून जाई ।
चिलटांचा त्रास मग न्हाई ।
डासांचा त्रास मग नाही ।
रोगाला थाराच नाही ।।
मग आरोग्य सांगू काई ।

नाहीतर देवी गोवर कांजिण्या पटकी महामारी ।
खरूज नारू करटं नायटे कायमची फेरी ।।
ह्या रोगांतून तुमचे गावकरी कसे वाचवाल ।
औषध नाही डॉक्टर नाही रोग्याचे हाल ।।

देवाला नवसचि करता ।
अंगारे धुपारे करता ।

भुतंखेतं पिशाच्चहि बघता ।
देवऋषाच्या पाया पडता ।
ताईत गंडे बांधुनि का रं रोगि जगविणार ? ।
उठा झडकरी शहरी जाऊन आणवा डॉक्टर ।।
डॉक्टर येतील भरकन् घेऊनि अपुली मोटार ।
जोडरस्त्याविण त्यांची मोटर खड्ड्यात आडणार ।।
जोडरस्ता अजून का रं न्हाई ?
किति दंग संसारापायी ?
कशि कळ कुणालाच न्हाई ।
प्रपंचातुन वेळ काढुनि गावचं हीत साधा ।
आडव्या रस्त्यानं मोठ्या रस्त्याला आपलं गाव सांधा ।।
बाळंतिणीची जनावरांची कुचंबणा फार ।
वेळेवर नाही डॉक्टर म्हणुनी पटपट मरणार ।।
आता उठा उठा भरभर ।
घ्या कुदळ घमेलं खोरं ।
सारी जमा लहान थोर ।
उद्या सकाळी जोड रस्त्याचं सुरू करू काम ।
श्रमदानानं आपुल्या गावासाठी गाळू या घाम
ओढ्यापासून सणगर वाडा रस्ता बनविला ।।
किसरुळ गावचा महादेव शाहीर हरकुनिया गेला ।।

## चौक ५ वा

नदीचं पाणी आपुल्या गांवाला लाभलंय नशिबानं ।
पानोठ्याला चिखल निसरडं कायमची घाण ।।

पायऱ्या करू या घाट बांधुया करतोय बडबड ।
बैठक झाली कि ज्यो त्यो धावला आपुल्या घराकडं ॥
पावसाळा गेला हिवाळा गेला उन्हाळाही गेला ।
दिवस गेला महिना गेला जल्मसुधी गेला ॥

नदीवरच्या पानोठयाला ।
कधी पायऱ्या करू या बोला ।
श्रमदान कष्ट करण्याला ।
कधि जमू या लौकर बोला ।

टेकावरचे दगड लोटुनी बांधूया घाट ।
बायकापोरांना बाराहि महिने सुंदर मग वाट ।

विहिरीला पैसा जमवा ।
सरकारी सहाय्यही मिळवा ।
ओढयावरती विहिर ती चढवा ।

दूषित पाणी पिऊ नका कुणि आता स्वराज्यात ।
सहाय्य कराया अपुलं सरकार सज्ज तुम्हांपुढतं ॥

करा दूर सारी गाऱ्हाणी ।
हरिजनासि द्याहो पाणी ।
द्या नविन विहिर काढोनी ।

राहाण्यासाठी सुंदर छोटी बांधून द्या घरं ।
हरिजनवस्ती तुमच्या गावची करा नमुनेदार ॥
हेवेदावे पाटर्या दुफळया कधी संपणार ।
न्यायनीतीनं राज्य हाकारा करतो नमस्कार ॥

## चौक ६ वा

आपल्या गावात उजेड दावा । चौकाचौकांत कंदील
लावा ॥ ध्रु० ॥

अंधारातला नको कारभार ।
उजेडात करा व्यवहार ।
रात्री जमूनि चावडीच्या म्होरं ।
गावहिताच्या बैठकी भरवा । आपल्या गावास उजेड दावा ।।

उजेडानंच फायदा होणार ।
ठेचा रस्त्यात नाही लागणार ।
पाय घाणीत नाही पडणार ।
लांब शौचाला जातील पोरं ।
बायाबापड्यांची सोय काही करवा ।
नविन संडास गोपुरी आणवा ।। धृपद ।।

पंचायतीला सत्ता आली वसुल बि जमला चावडीवर ।
आता कशाची कुरकुर सांगा ठेवु नका कुठं अंधार ।।
शौचाला कुठे हो जावे ? ।
ते ठिकाण तरी दावावे ।
शेताचे बांध तुडवावे ।
पायात काटे मोडावे ।
चिखलाचे बूट चढवावे ।
चारी बाजुनी (शेतामधुनी) मंडळी फिरती हिकडुनिया तिकडे ।
शौचापाई बायाबापड्यांचे निघती धिडवडे ।।
तुम्हि गावचे पुढारी थोर ।
करा शांत मनी सुविचार ।
ही अडचण करा हो दूर ।
बायकांसाठी झडकरी बांधा गोपुरि संडास ।

दुहेरि फायदा होईल वाचल बायकांचा त्रास ॥
गावात आखाडा पैलवान जाडा लढणार तगडा असावा ।
खाऊन बुडविणार, मैदानात पडणार, बायकांकडे बघणारा नसावा
गावाची राखण करूनी जागरण फेऱ्या मारणारा असावा ।
दरवडा येता दगड पडता घरात बसणारा नसावा ॥
कुस्ती खेळणारा असावा ।
पण गावाला पीडणारा नसावा ।
गावाचा लाडका मैदानात पडका पैलवान रोडका नसावा ॥

## चौक ७ वा

सर्वांगांनी शेती सुधारा ऐकुनि घ्या खूणा ।
पहिल्या प्रतिचा बी वियाणा हुडकुनिया आणा ॥
जनावरांची उत्तम व्हावी निपज पैदास ।
खोंड खिल्लारी वळू पाळुया आपुल्या गावास ॥
निकस जमिनी सकस बनवा बांधुनिया ताली ।
धूप थांबली पिके काढिली बघारे भौताली ॥
कोंबडी पालन उत्तम धंदा करारे अभ्यास ।
अंडी विकूनी पैका मिळवा तुम्ही भसाभस ॥
शाहिर थकला घसाहि सुकला आरडून ओरडून ।
विकास योजना दारात आल्या घ्यारे राबवून ॥
चांगले विचार चांगले आचार चांगल्या योजना ।
गावचे कल्याण खचित करतील ध्यानामधी आणा ॥
स्वातंत्र्यामधि विकास साधा आली नामि संधी ।
जुगार आकडे व्यसने सोडा करा नशाबंदी ॥

दारुबंदीचा कायदा सुखकर सुराज्याची नांदी ।
महादेव शाहिर खेर गिल्डरा आदराने वंदी ।।
दुफळचा मोडा आळस झाडा लागा कार्याला ।
ग्रामराज्याचा गाडा भरधाव जाऊ दे आघाडीला ।।
गाव सुधारलं गाव सुधारलं होईल बोलबाला ।
अशा गावच्या पोवाड्याची हौस शाहिराला ।।
लोकशाहीचा फिरता शाहिर दारावर आला ।
नानिवडेकर हात जोडतो ऐका पोवाड्याला ।।

## चौक ८ वा

स्वातंत्र्यामधि राष्ट्रभाट हा खरा हक्कदार ।।
लोकशाहीची कीर्त गावया फिरे दारोदार ।।
नव्हता फोनो नव्हता रेडिओ सिनेमाही नव्हता ।
तेव्हापासून कलगि तुऱ्याचा डफ गावी होता ।।
तुणतुणं चढवुन खड्या सुरावर गाईल शाहीर ।
देशभक्तिनं भारुन टाकिल दरेक घरदार ।।
मागासांना विकास कळविल समजुत घालून ।
पाचवर्षांमधि उजळुन जाईल देश विकासानं ।।
तीन तपांची सेवा दिधली विकास कार्याला ।
महादेव शाहीर नानिवडेकर माहित सकलांला ।।
पंचविस गावी फिरुन मी आलो तुमच्या तालुक्याला ।
स्वानुभवानं पोवाडा बांधला मान्य असो सकलां ।।
गावकऱ्यांना हात जोडतो करतो नमस्कार ।
लोकशाहीचा महादेव शाहीर नानिवडेकर ।।

■ ■

# भारतीयांस (पोवाडा)

राष्ट्रशाहीर कै. महादेव नारायण नानिवडेकर

यंत्राच्या घोड्यावर । होउनिया स्वार ।
विश्वसंचार । कराया वीर तुम्ही नटला ।
बना बलशाली आज काला । बलाविण कोण जगी
तरला ॥ धृ० ॥

थंडी वारा पाऊस आणि उन्ह । बदलते हवामान ।
कराया सहन । शरीर हवे दणकट मजबूत ॥
यंत्र चालवाया जोरात । हातपाय हवेत तुमचे मस्त ॥ १ ॥

शरीर कमवा व्यायामानं । घाम गाळून ।
छाती फुगवून । उंची आणि वजन वाढवून ।
आदर्श आरोग्य मिळवून । भारता नटवा वैभवानं ॥ २ ॥

जो बळी तोच कान पिळी । नियम तिन्ही काळीं
जळीं आणि स्थळीं । बळी तोच भोगी राज्यसत्ता ॥
दुर्बळाच्या शिरीं सदा लाथा । इतिहास दृष्टीआड करतां ?
॥ ३ ॥

मारुतीचे आठवा शौर्य । कडक ब्रह्मचर्य ।
प्रचंड कार्य । सप्त सागर करून गेला ।
सीतेचा शोध लावियेला । लंका जाळून परत फिरला ॥४॥

तो भीम पराक्रमशाली । मांडी (छाती) फोडिली ।
खोड मोडिली । दुष्टमति दुर्योधन (दुःशासन) त्याची ।
आठवा कीर्ति शिवाजीची । ठोशाला ठोसा वृत्ति ज्याची ॥५॥

स्वातंत्र्य करा मजबूत । खपून अहोरात ।
अपुल्या क्षेत्रांत । शील चारित्र्य नीट राखा ।
पत्करू नका मुळी धोका । डरु नका दुष्मनांच्या धाका ॥६॥

राष्ट्राचे भावी आधार । तरुण तुम्ही वीर ।
तुम्हांवर भार । मायभूमीचे पांग फेडा ॥
चौघडा घुमु द्या धडधडा । महादेव गातो पोवाडा ॥ ७ ॥

'नानिवडेकर शाहिरी संगम' संचालित 'कै. क्रांतिशाहीर ग. द. दीक्षित लोककला विद्यापीठ' आणि शाहीर महर्षि पांडुरंग दत्तात्रेय खाडिलकर पोवाडे गायन विद्यापीठ व तत्सम संस्थांना आपापल्या संस्थेतील विद्यार्थ्यांना पोवाडा शिकविताना उपयोगी पडेल अशा सुटसुटीत पुस्तकाची आवश्यकता बऱ्याच दिवसांपासून जाणवत होती.

या वर्षी पुणे येथे कै. म. ना. नानिवडेकर पुण्यतिथी समितीने 'नानिवडेकर शाहिरी संगम' चे स्फूर्तिस्थान राष्ट्रशाहीर कै. महादेव नारायण नानिवडेकर ह्यांच्या २५ व्या पुण्यतिथि वर्षाची सांगता व २६ वी पुण्यतिथि हा योग साधून शाहीर नानिवडेकरांचे व्यक्तिमत्व उलगडून दाखविणारी 'नरसिंह' या नावाची स्मरणिका प्रकाशित केली. स्मरणिकेचे संपादन अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे अध्यक्ष श्री. बिंदुमाधवराव जोशी ह्यांनी अत्यंत कुशलतेने व आटोपशीरपणे केले. सदर स्मरणिकेसाठी शाहीररत्न श्री. किसनराव हिंगे ह्या शाहीर नानिवडेकरांचा आशीर्वाद लाभलेल्या शिष्योत्तमांनी आपल्या सर्व तरुण सहकाऱ्यांच्या, शिष्यांच्या सहकार्याने हातभार लावला. त्या स्मरणिकेत प्रसिद्ध झालेले पोवाडे 'पुस्तकरूपान प्रसिद्ध करण्यास आम्हांस अतिशय आनंद होत आहे.

राष्ट्रशाहीर म. ना. नानिवडेकरांचे अन्य साहित्यही पुस्तकरूपाने क्रमाक्रमाने प्रसिद्ध करण्याचा आमचा मानस आहे.

आमच्या या प्रयत्नाचे शाहिरी क्षेत्रात व शिक्षण आणि साहित्य क्षेत्रात स्वागत होईल असा विश्वास वाटतो.

**व्यवस्थापक : नानिवडेकर शाहिरी संगम**

---

© सर्वाधिकार सुरक्षित

**मुद्रक :** ज. ता. गायकवाड, मायबोली प्रिंटर्स, ४०५/ नारायण पेठ, पुणे ४११०३०.

**प्रकाशक :** नानिवडेकर शाहिरी संगम,
१/१८ गोरेगावकर चाळ, गिरगाव, मुंबई ४०० ००४.